# भारतीय महिलांचा प्राचीन वैदीक काळातील सामाजिक व शैक्षणिक दर्जा

**प्रा. एस्. बी. बर्गे** (M.A., M.Ed., L.L.B.) महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मार्केट यार्ड कोल्हापूर.

---

**सारांश -**

भारतीय स्त्रीचा सामाजिक दर्जा व स्थान ठरविण्यासाठी ज्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक घटकांचा प्रभाव स्त्री जीवनावर पडलेला होता, त्या घटकाचा अभ्यास करणे अपरिहार्य आहे. समाजात असलेल्या कुटुंब, नातेसंबंध, विवाहपद्धती, वारसाहक्क, धार्मिक संस्था, राजकीय संस्था, इत्यादी स्वियाच्या सामाजिक दर्जा व स्थानावर प्रभाव टाकतात. प्राचीन काळ हा कालखाचा विचार करता खूप मोठा आहे. सिंधु संस्कृती, पूर्व वैदीक काळ, उत्तर वैदीक काळ, महाजनपदांचा काळ, मौर्य काळ, गुप्तकाळ, गुप्तोत्तर काळ, या सर्वच प्राचीन कालखंडाच्या टप्यात स्त्रियांच्या दर्जात अनेक चढउतार झाले. सिंधु संस्कृती, द्रवीड संस्कृती, वैदीक संस्कृती, इत्यादीबरोबर विविध आदीवासी संस्कृती यांचे परस्परांवरील प्रभुत्व व मिलन आणि विरोध यामुळेही स्त्रियांच्या दर्जात वारंवार बदल झाला असे दिसते.

प्राचीन कालखंडाच्या सुरुवातीला भारतीय स्त्रियांचा दर्जा हा पुरुषांच्या बरोबरीचा होता. त्यांना समाजजीवनात आदराचे स्थान होते. नंतरच्या काळात स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर अनेक बंधने आली. त्यामुळे त्याचा विकास मंदावला व त्याचबरोबर समाजजीवनातील त्यांचा दर्जाही खालावला. प्राचीन कालखंडाच्या अनेक टप्प्यात समाजात अनेक सामाजिक चालीरीती व रुडीपरंपरा यात बदल होत गेला. प्राचीन काळात सामाजिक चालीरीती व रूढीपरंपरा नियंत्रीत करण्यासाठी स्मृतिकार व ग्रंथकारांनी अनेक ग्रंथ लिहिले ते ग्रंथ म्हणजेच समाजाचे कायदेकानून होते. त्यांच्या आधारेच स्त्रियांचा सामाजिक दर्जा ठरत असे. प्रस्तूत लेखा मध्ये पुढील काही मुद्याच्या आधारे प्राचीन वैदीक काळातील स्त्रियांच्या सामाजिक दर्जाची चर्चा करता येईल.

1) विवाह :

पुरुष व स्त्री यांना पती-पत्नी या नात्याने एकत्र आणण्यास विवाह हा मानवाच्या सामाजिक जीवनातील एक अत्यंत महत्त्वाचा संस्कार होता. प्राचीन काळाच्या सुरुवातीला वैदिक कालखंडात स्त्रियांचा आदर केला जात होता. त्यामुळेच त्यांचा सामाजिक दर्जा चांगला होता. त्यांच्या विवाहाचे वय 16 ते 17 वर्षे होते. तसेच मुलींना शिक्षणाचा हक्क होता. त्यामुळे पतीच्या निवडीचे मुलींना स्वातंत्र्य होते. विवाहाचा उद्देश पत्नीबरोबर गृहस्थ धर्माचे पालन करणे, धार्मिक विधी पूर्ण करणे, वंशवृद्धी इत्यादी मानले जात होते. स्त्री ही विवाहानंतर संबंधीत पुरुषाची जन्मभराची साथीदार होत असे. पतीच्या घरातील तिचे आगमन शुभसूचक मानले जात असे. विवाहानंतर पतीबरोबर तीचा घरावर संयुक्त अधिकार प्रस्थापित होत असे. विवाहावेळी वधू-वर देवाला प्रार्थना करताना मुलांच्या प्राप्तीबरोबर भरपूर जमीन व गोधनाच्या प्राप्तीची अपेक्षा करीत. मात्र मुलीच्या जन्माचे स्वागत होत नव्हते. त्याचे कारण अंत्यविधीचे अधिकार फक्त पुरुषालाच होते. त्यामुळे समाजात पुत्रजन्मास महत्त्व प्राप्त आले होते. क्षत्रियांमध्ये स्वयंवर पद्धती सर्वमान्य होती. मात्र स्ववर्णात विवाह व्हावा अशी बंधने होती. या कालखंडात मुलीचा विवाह झालाच पाहिजे अशी बंधने नव्हती यावेळी स्त्रियांना अविवाहीत राहण्याचे स्वातंत्र्य होते. गृहस्थाश्रम स्विकारताही ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेता येत असे ब्रह्मवादिनी स्त्रिया आपल्या वडिलांच्या घरी राहत असत. धर्मग्रंथ स्मृतिग्रंथ, सूत्रग्रंथ इत्यादीमधून प्राचीन काळात आठ विवाह प्रकार अस्तित्वात होते असा उल्लेख मिळतो, ते प्रकार पुढीलप्रमाणे

- ब्राह्म विवाह

या विवाह प्रकारात मुलीचे वडील वेदाभ्यासात पारंगत असलेल्या मुलास आपल्या मुलीबरोबर विवाह करण्यासाठी आमंत्रित करीत असत.

- दैव विवाह

या पद्धतीनुसार यज्ञाच्या ऋत्विजात्य कन्यादान केले जात असे. हा विवाहाचा प्रकार सर्वसामान्याना नसल्याने त्याची विवाहसंस्था ही मर्यादीत राहीली. त्यामुळे हा विवाहप्रकार कालबाह्य ठरला.

- आर्ष विवाह

या विवाह प्रकारात वरपक्षाकडून वधूपक्षाला एक गाय व बैल दिला जात असे. आणि हेच या विवाह प्रकाराचे वैशिष्ट्य होते.

- प्रजापत्य विवाह

या विवाहप्रकारात स्त्रियांचा आदर ठेवला जात असे. या विवाहानुसार पती-पत्नीचे सहधर्माचरण अभिप्रेत होते. पतीने पत्नी जिवंत असताना दुसरा विवाह करू नये तसेच गृहस्थाश्रमाचा त्याग करून वानप्रस्थ किंवा संन्यास आश्रमाचा स्वीकार करू नये. पत्नीच्या मृत्यूनंतर मात्र या गोष्टींचे स्वातंत्र्य होते.

- असूर विवाह

या विवाह प्रकारात वरपक्षाकडून मुलीच्या वडिलांना संपत्ती देवून मुली विकत घेतल्या जात असत. अशा मुलीशी केलेला विवाह म्हणजे असूर विवाह होय. धर्मशास्त्रानुसार अशा विवाहाला मान्यता दिली जात नव्हती. परंतु समाजात हा विवाह प्रकार रूढ होता.

- गांधर्व विवाह

हा विवाह प्रकार म्हणजे प्रेमविवाह होय. परस्परांच्या प्रेमात पडलेल्या स्त्री पुरुषांनी परस्परांच्या संमतीने विवाह करणे म्हणजे गांधर्व विवाह पद्धती होय. काही धर्मग्रंधातून या विवाह पद्धतीचे समर्थन केले आहे.

- राक्षस विवाह

या विवाह प्रकारात मुलीला जबरदस्तीने पळवून आणत असत. अशा मुलींशी केलेला विवाह म्हणजे राक्षस विवाह होय. हा विवाहाचा प्रकार क्षत्रियांमध्ये रूढ होता. युद्धात स्त्रियांना जिंकून आणून त्यांच्याशी विवाह केले जात असत.

- पिशाश्च विवाह

या विवाहप्रकारात संबंधीत मुलीला दारू पाजून बेशुद्ध स्थितीत आणून किंवा बेसावध असताना तिची फसवणूक करून विवाह करीत असत.

वरील आठही विवाहप्रकारात कमीजास्त प्रमाणात प्राचीन काळी भारतीय समाजात रूढ होते, ब्राह्म विवाह गांधर्व विवाह, प्रजापत्य विवाह हे स्त्रीला समानतेचा दर्जा देत होते. इतर विवाहात तिचा दर्जा खालावलेला होता.

2) नियोग पद्धती

पतीचा मृत्यू, असाध्य रोग, निर्बीजत्व, इत्यादी कारणांमुळे स्त्री निपुत्रिक असेल, तर तिने केवळ पुत्रोत्पत्तीसाठी अन्य पुरुषाशी विधीपूर्वक समागम करण्याची प्राचीन भारतीय प्रथा होती. स्त्रीचीही संमती त्यासाठी आवश्यक मानली जात होती. वंश चालू रहावा हा या प्रथेमागील प्रमुख उद्देश होता. कालांतराने कांही धर्मशास्त्रकारांनी या प्रथेला तिव्र विरोध दर्शवला. या प्रथेमुळे वंश चालू रहात असे. मात्र स्त्रियांचा दर्जा घसरला होता असे दिसते. स्त्रीच्या पावित्र्यापेक्षाही वंश चालू राहणे महत्त्वाचे मानले जात होते. स्त्रीने नियोगाच्या मार्गाचा आवलंब करण्यसाठी पुरुषांचा दबाव रहात असावा. स्त्रीच्या पावित्र्यापेक्षाही वंश चालू राहण्यासाठी महत्त्व दिले जात होते. समाजातील लोक अशा स्त्रीकडे दयाबुद्धीने पहात असावेत.

3) विधवा पुनर्विवाह

प्राचीन काळात विधवांच्या पुनर्विवाहाला मान्यता होती. एखाद्या स्त्रीचा पती कांही कामानिमित्त घराबाहेर गेला व पाच वर्षपिक्षा जास्त कालावधीत परत आला नाही अथवा येवूनसुद्धा त्या स्त्रीची त्याच्याबरोबर राहण्याची इच्छा नसेल तर तिने आपल्या कुटुंबातील जवळच्या नातेवाईकाशी लग्न करावे असा संकेत होता व ती रूढीपरंपरा बराच काळ चालू होती. विशेषतः तिने दिराशी लग्न करण्यासाठी समाज विशेष अनुकूल होता. पती हरवला असेल, मरण पावला, संन्यसी झाला, नपुसंक असेल व पतीत झाला असेल तर अशा वेळी स्त्रीला दुसरा विवाह करण्याचा अधिकार होता. प्राचीन काळात आपल्या समाजाच्या रक्षणासाठी जास्तीत जास्त विर पुरुषांची आवश्यकता होती, त्यामुळेच पुनर्विवाहाला परवानगी होती.

4) केशवपन

विधवांचे केशवपन करण्याची प्रथा प्राचीन भारतात साधारणपणे इ.स. 500 नंतर सुरू झाली. वेगवेगळ्या धर्मग्रंथातून वेगवेगळ्या अपेक्षा व्यक्त केलेल्या दिसतात. नवव्या शतकानंतर केशवपन पद्धती मोठ्या प्रमाणावर सुरू झाली. विधवा स्त्रियांनी केशभूषा करू नये असे मानले जात होते. विधवा सती न जाता जिवंत राहणार असेल तर तिने आपल्या केसांचा त्याग करावा तसेच आपले शरीर तपश्चयेने शुष्क करावे. केशवपनाची रूढी ब्राह्मण जातीत मोठ्या प्रमाणावर होती. कनिष्ठ वर्णातुन केशवपन पद्धती फारशी अस्तित्वात नव्हती. वरीष्ठ वर्णातून व जातीतून ही प्रथा मोठ्या प्रमाणावर रूढ होती.

5) सतीप्रथा

प्राचीन काळात पतीच्या मृतदेहाबरोबर जिवंत जाळण्याची प्रथा होती. भारताबरोबर आशिया व युरोप खडातसुद्धा सतीप्रथा होती. भारतात प्राचीन काळाच्या सुरुवातीला ही प्रथा नवरती त्याकाळात युद्धात अनेक पुरुष मारले जात होते. अशा परिस्थितीत पुत्र प्राप्तीसाठी जेवढ्या स्त्रिया असतील तेवढ्या आवश्यक मानल्या जात होत्या. त्यामुळे सतीप्रथेऐवजी नियोगाला प्रोत्साहन दिले गेले. इ.स. 4 थ्या शतकापासून सतीप्रथा अस्तित्वात असल्याचे दिसते. विविध धर्मग्रंथ, वाङमयीन

सहित्य यामधून सती प्रथेची माहिती मिळते. स्त्री सती गेल्यानंतर स्त्रीला मोक्ष प्राप्त होऊन तिला स्वर्ग प्राप्ती होते. अशी अंधश्रद्धा होती. स्मृतिकारांनी सतीप्रथेला विरोध केलेचे दिसून येते.

6) पडदा पद्धती

पहिल्या शतकापासून राजघराण्यातील स्त्रियांमध्ये पडदा पद्धती अस्तित्वात होती. राजघराण्यातील स्त्रियांचे अनुकरण श्रीमंत, सरदार, जमीनदार, जहागीरदार यांच्या घरातील स्त्रिया करू लागल्या त्यामुळे पडदापद्धती वाढू लागली. दहाव्या शतकापर्यंत राजघराणी व श्रीमंत स्त्रियांशिवाय पडदा, फारसा वापरला जात नव्हता. पडदा पद्धतीमुळे स्त्रियांना सामाजिक जीवनात फारसे स्थान राहिले नाही. तसेच त्यांचे सहशिक्षण, विवाहाचे वय, विधवांचा दर्जा, इत्यादी प्रत्येक बाबतीत प्रतिकूल परिणाम घडू लागले.

7) वारसा हक्क

प्राचीन काळात वैदिक कालखंडात पती पत्नी यांना उद्देशून दंपत्ती हा शब्द वापरला जात होता. घराचे संयुक्त मालक असा त्याचा अर्थ होतो. याचाच अर्थ पती व पत्नी घराचे व घरातील चीज वस्तूंचे संयुक्त स्वामी अथवा मालक समजले जात होते. परंतु पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीला मालमत्तेत समान वाटा व दर्जा मिळाला नाही. जरी कांही वेळा मालमत्तेत हक्क मिळाला तरी तो हक्क गौण प्रकारचा होता. पत्नीला पतीच्या मालमत्तेत एक तृतीयांश हक्क मिळत होता. पती प्रवासाला किंवा काही कामानिमित्त बाहेरगावी गेल्यास पत्नी आपला नेहमीचा खर्च करीत असे. जमीन, घर, पशुधन ही स्थावर मालमत्ता मोठ्या अविभक्त कुटुंबाची समजली जात असे. परतु घरातील दागदागिने, अलंकार, वस्त्रे यासारख्या जंगम मालमत्तेवर स्त्रियांचा हक्क मान्य करण्यात आला होता.

- मनुस्मृती या ग्रंथात स्त्रीधनाचे सहा प्रकार सांगितले आहेत.

1) वडिलांनी दिलेल्या भेटवस्तू
2) आईने कन्या भेटवस्तू
3) भावाने दिलेल्या भेटवस्तू
4) विवाहानंतर पतीने दिलेल्या देणग्या
5) विवाहाच्या वेळी नातेवाईक व इतरांकडून मिळालेल्या देणग्या
6) विवाहानंतर नव्या घरी आल्यावर दिलेल्या देणग्या

सांगितलेल्या सहा प्रकारांनी स्त्रीला स्त्रीधनाची प्राप्ती होत असे. विष्णस्मृतीने स्त्रीधनात तीन गोष्टींचा समावेश केला आहे.

1) मुलाने दिलेले आलंकार, दागिने, भेटवस्तू, इत्यादी देणग्या,
2) नातेवाईकांनी दिलेल्या देणग्या,
3) पतीने दुसरा विवाह केल्यानंतर भरपाई म्हणून दिलेली संपत्ती, नातेवाईकांशिवय इतरांकडून मिळालेल्या देणग्या व सवात काम करून मिळवलेली संपत्ती यांचा समावेश स्त्रीधनात होतो. बरील दोन्ही ग्रंथकर्त्यांनी स्त्रीधन संकल्पना मांडली आहे. त्यातून एक गोष्ट स्पष्ट होते की स्त्रीचा स्थावर मालमत्तेवर निश्चित असा हक्क दिसत नाही. मात्र जंगम मालमत्तेवर तिचा हक्क होता असे दिसते.

वैदिक काळात विवाहीत मुलींना वडिलांच्या संपत्तीत वारसा हक्क नव्हता. तसेच वडिलांना मुलगा असल्यास मुलीला हक्क मागता येत नसे. परंतु मुलगी अविवाहीत असेल तर हक्क दिला जात होता, भाऊ असलेल्या मुलीला मात्र वडिलांच्या संपत्तीत हक्क मिळत नव्हता. साधारण जोपर्यंत विधवा पुनर्विवाह होत होते व नियोगाची पद्धत अस्तित्वात होती तोपर्यंत विधवांना संपत्तीत हक्क मिळत नव्हता.

8) सामाजिक व धार्मिक जीवनातील दर्जा

वरील सर्व मुद्द्यांचा विचार केल्यानंतर आपल्या लक्षात येते की, वैदिक कालखंड हा स्त्री जीवनाच्या प्रगतीच्या दृष्टीने सुवर्णाक्षरांनी लिहिण्यायोग्य होता. वैदिक काळात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान होते. समाजामध्ये व स्वगृही मानाचे स्थान होते.

वैदिक कालखंडानंतर धर्मसूत्रांच्या काळात स्त्रियांचा दर्जा व प्रतिष्ठा यात हळूहळू अनिष्ठ बदल होत गेला. याकाळात मुलींचा विवाह लवकर होवू लागला. आणि तेच स्त्रियांच्या विकासाच्या मार्गातील मोठी अडचण ठरली. त्यांचा शिक्षणाचा मार्ग विवाहामुळे बंद झाला. त्यामुळे त्या शुद्र मानल्या जावू लागल्या. याकाळातील विविध धर्म ग्रंथातून त्यांचे दुय्यम स्थान स्पष्टपणे दिसून येते. पुढे त्यांच्या शिक्षणावर बंदी घालण्यात आली. बालविवाहाची पद्धती सर्वत्र रूढ झाली. त्यांचा वडिलांच्या संपत्तीत असलेला हक्क नाहीसा झाला. त्यामुळे सती जाण्यास उत्तेजन मिळू लागले. तसेच विधवांचे

जीवन अतिशय खडतर असल्याने स्त्रिया सती जाणे मान्य करू लागल्या. शिवाय धर्मशास्त्रातून या प्रथेला पाठींबा मिळू लागला. स्त्रीचा दर्जा या कालावधीत निश्चीतपणे खालावला.

**प्राचिन भारतातील स्त्री शिक्षण**

- वैदीक काळ (इ. स. 800 पर्यंत):

वेदकाळातील साहित्याचा आढावा घेतल्यानंतर त्या काळातील स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार होता असे दिसते. आजच्या काळातील सर्व क्षेत्रातील त्यांना ज्ञान घेता आले नसले तरीही त्यांच्या शिक्षणा पाठीमागे उद्देश जपण्यात आले होते. दैनंदिन जीवन सुखी जगणे, व्यवहार उपयोगी ज्ञान मिळवणे, आत्मकल्याण साधणे, संस्कारक्षम पिढी निर्माण करणे, नैतिकता, चारित्र्याचे संवर्धन करणे, संस्कृती, धर्माचे सातत्य टिकवून ठेवणे, आदर्श माता, आदर्श पत्नी इत्यादी उद्दिष्टांनी कौटुंबिक जीवनातील सीचे स्थान कायम असे.

- प्राचीन भारतीय शिक्षण पध्दतीची उद्दिश्ये :
- सामाजिक स्थैर्य निर्माण करणे.
- व्यक्तीमत्वाचा विकास साधणे,
- चारित्र्य संवर्धन करणे,
- सामाजिक जाणीव निर्माण करणे.
- संस्कृती रक्षण व संवर्धन करणे.

वैदिककालखंडामध्ये इतर कालखंडाच्या तुलनेत स्त्रीजीवन अतिशय सुकर होते असे म्हणता येईल, समाजात स्त्रियांना सर्वच क्षेत्रात विशेष अधिकार होते. शिक्षणासाठी मुली अविवाहीत ही राहू शकत. काही मुली 16 वर्षापर्यंत अविवाहीत राहून शिक्षण घेत असत.

- उपनयनाचा अधिकार :

वैदिक काळातील समाजात मुलाप्रमाणे मुलींना उपनयनाचा अधिकार असल्याचे दिसून येते. 'न्यायाचा विस्तार' यात मुलींना उपनयनाचा अधिकार आहे असे स्पष्ट केले आहे. उपनयना सोबतच यज्ञकार्यातही सहभागी होण्याचा अधिकार स्त्रियांना होता. म्हणून स्त्रियांना ब्रम्हयर्च विद्या किंवा धार्मिकतेचे शिक्षण दिले जात असे.

- विद्यार्थी जीवनाचा अधिकार :

उपनयनानंतर स्त्रियांना शिक्षणक्रम सुरू करता येत असे. शिक्षण समाप्तीचा काळ हा ठराविक असे. स्त्रियांच्या शिक्षण घेण्याच्या अधिकाराबाबत अथर्व वेदात स्पष्ट उल्लेख आहे. कुमारिका, ब्रम्हचर्य किंवा वेदाभ्यासाद्वारे तरूण पती प्राप्त करते. स्त्रियांना ऋतुप्राप्ती पूर्वी त्यांचे शिक्षण पूर्ण झाले पाहिजे असे हरीता या कायदे पंडीताचे मत होते. असे असले तरीही स्त्यिांच्यामध्ये 'ब्रम्हवादिनी' आणि 'सद्योवधू' हे प्रकार अस्तित्वात होते. 'ब्रम्हवादिनी' आयुष्यभर विद्यार्थीनी म्हणून जगत असत. आपल्या ज्ञानसाधनेत कोणतीही बाधा नको म्हणून काही ब्रम्हवादिनी अविवाहीत रहात सद्योवधू मात्र विवाह होईपर्यंत अध्ययन करीत असत. मुलाप्रमाणे मुली गुरूगृही राहून शिक्षण घेत असत.

- यज्ञ मंत्राचा अधिकार :

उपनयन झाल्याशिवाय कोणालाही मंत्रोच्याराचा अधिकार नव्हता. साहजिकच उपनयनाचा संस्कार झाल्याने स्त्रियांना यज्ञ मंत्राचा अधिकार प्राप्त झाला होता. असा अधिकार केवळ घरगुती विधी अथवा संस्कार विधीच्या कार्यात स्त्रियांना मिळकत असे. मोठ्या यज्ञविधीत मात्र पती असल्याशिवाय तिला यज्ञमंत्र म्हणण्याचा अधिकार नव्हता. सीता यज्ञासारखे स्वतंत्ररित्या यज्ञ केवळ स्त्रियांच करू शकत असत. हरिताने अग्रहायणी कर्म या ग्रंथात स्त्री व पुरुषांना समान मंत्र म्हणण्याचा अधिकार असल्याचे म्हणतो.

- शिक्षण प्रणालीतील नियमांचे पालन :

मुलींना मुलाप्रमाणे गुरुगृही राहण्याचे बंधन नसले तर मुलींना कंबरपट्टी घालावा लागे, वेदांचा अभ्यास आणि गायत्री मंत्राचे अध्ययन सक्तीचे होते.

प्रामुख्याने शिक्षण घेणाऱ्या मुलींचे दोन प्रकार असल्याचे दिसून येतात.

- ब्रम्हावादिनी व सद्योवधू :

ब्रम्हावादिनी - आयुष्यभर धर्मशास्त्र व तत्वज्ञानाचा अभ्यास करून आपली उच्च दर्जाची विद्वता सिध्द करीत असे. गुरुज्ञानाचे त्यांना आकलन होते. त्या उपनयन, यज्ञयाग, वेदाभ्यास करण्याचा त्यांना अधिकार होता.

सद्योवधू - सात्पुरत्या शिक्षणानंतर वधू होणारी स्त्री, तिला विवाहापर्यंत शिक्षण घेता येत असे. वैदीक धर्मातील तत्वज्ञान व वैदिक स्रोत्रे तोंडपाठ करावी लागत असत. विवाहानंतर याचा फायदा पतीबरोबर धार्मिक विधीसाठी त्या करीत असत.

- स्त्रियांसाठी अभ्यासक्रम :

वेद, ब्राम्हणे, उपनिषदे ह्या बरोबरच स्त्रियांच्यासाठी 1. पराविद्या व 2. अपराविद्या अशी व्यवस्था होती, पराविद्येत-अक्षरज्ञान, आध्यात्मिक ज्ञान, आत्मा परमात्मा यांचे सखोल ज्ञानाची माहिती असे. अपराविद्येत सृष्टीविषय ज्ञान, स्पष्ट उच्चाराचे ज्ञान व पठण, वैदिक धर्मविधी करण्याची पध्दती तसेच योतिष वेद, वेदांगे यांचा समावेश असे.

नारद स्मृती नुसार महाकाव्ये, वेद, गारुडी विद्या, राजनिती, तर्कशास्त्र, कालक्रम, लष्करशाख इत्यांदीचा अभ्यासक्रमात समावेश असे. स्त्रियांनी वरील दोन्ही विद्यांचा अभ्यास केल्यामुळे त्या थोर विदुषी झाल्या.

स्त्रियांना गायन, वादन शिकवले जात असे. स्त्रियांना लष्करी शिक्षण मिळाल्यामुळे त्या प्रत्यक्ष युध्दात भाग घेत असत. वध्रिमती व विष्पाला या दोघींनी प्रत्यक्ष युध्दात भाग घेतला होता. मुदगलानी नावाच्या खीने आपल्या पतीच्या रथाचे सारथ्य करून त्याला विजय प्राप्त करून दिला होता. राजघराण्यातील मुलींना लष्करी व प्रशासकीय शिक्षण दिले जात होते. युध्दकलेतही त्या काळातील स्त्रिया तरबेज असल्याचे दिसून येते.

विद्वान स्त्रिया :

वेदकाळात अपाला, घोष, सूर्या, गार्गी, मैमैयी, शची, गोधा, अदिति, विश्ववरा, आत्रेयी, वाक, श्रध्दा, वैवस्वतीयमी, विष्पाला, मुदगलानी, लोपामुद्रा, इंद्राणी, वनिमती, सरमा, उर्वशी इत्यादी विद्वान स्त्रियांची माहिती मिळते. यातील काही स्त्रिया ज्ञानदान व अध्यापन ही करीत असत.

- स्मृती कालीन स्त्री शिक्षण (इ.स.पू. 800 ते इ.स. 300) :

या काळातील स्त्रीयांच्या जीवनात सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक अधिकारात कसे बदल होत गेले या विषयी माहिती मिळण्यास रामायण, महाभारत, बौध्द वाडमय, जैन वाडमय, स्मृती ग्रंथ, अर्थशाख व इतर शास्त्रीय ग्रंथ इ. साधनांचा उपयोग होतो.

या काळात दुर्दैवाने स्त्रियांचा दर्जा मोठ्या प्रमाणात खालावला होता. शिक्षणासाठी होणारे उपनयन आता नाकारण्यात आल्याने विवाह हाच उपनयनाचा संस्कार अशी व्यवस्था समाजमान्य झाली होती. इ.स.पूर्व 300 च्या दरम्यान स्त्री स्वातंत्र्यावर गदा आणणारी मनुस्मृती रचण्यात आली. मनुस्मृतीने स्त्रियांच्या उपनयनाची प्रथा बंद केली होती.

याज्ञवलक्य स्मृतीनुसार ही स्त्रियांचा उपनयनाचा अधिकार नाकारला होता. मिताक्षरानुसार उपनयन हा मुलांचा संस्कार व विवाह मुलींचा संस्कार आहे हे मान्य झाले होते.

शिक्षणामुळे पतीगृही खी योग्य वर्तन करणार नाही. ह्या भितीपोटी याज्ञवल्क्याने स्त्रीला अनेक बंधनात बंदिस्त केली होती. त्यामुळे स्त्रियांचे शिक्षण बंद झाले. स्त्रियांचा व्यक्तीविकास खुंटला गेला. प्रख्यात विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांनी ही कृती म्हणजे स्त्रीला शतकानुशतके अंधारात ढकलण्याचे कृत्य म्हटले आहे.

मुलींना नंतरच्या काळात बंधने वाढल्याने शिक्षणाविषयी त्यांचा ओढा कमी झाला. लग्नाचे वय कमी झाल्याने वेदाध्ययन मागे पडले व स्त्री शिक्षण लिहण्या, वाचण्यापुरते मर्यादीत झाले. तरीही त्याकाळात रेवा, रोहा,

माधवी अनुलक्ष्मी आदी स्त्रिया ही अध्ययन-अध्यापन करीत असल्याचे दिसून येतात. विद्या नावाच्या कवयित्रीने कौमुदी महोत्सव हे पाटक लिहले असून त्यामध्ये पाटलीपुत्र येथील राजकीय घडामोडीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

एकीकडे स्त्रिला शिक्षणापासून वंचीत ठेवणे आणि दुसरीकडे तिचा गौरव करणे, तिला घराचे भूषण, समृध्दीचे चिन्ह, पतीची अर्धांगी, मित्र, मार्गदर्शक म्हटले आहे. ही विरोधाभासाची आवस्था ह्या काळात होती.

- महाकाव्य काळातील स्त्री शिक्षण :

1. रामायण :-

या काळातील वरिष्ठ वर्णातील स्त्रियांना शिक्षण विषयक अधिकार असावे असे दिसते. सीता ही भारतीय परंपरेतील पाच आदर्श स्त्रियामधील एक अशी खी मानली जात असे. तिच्या उल्लेखाने महापातके नष्ट होतात असे म्हटलेले आहे. कौसल्याही यास अपवाद नव्हती. रात्रीच्यावेळी ती अनेक प्रसंगी मंत्रेच्यारण करीत असल्याचे संदर्भ सापडतात. शबरी ही तपश्चर्या करणारी स्त्री होती. वालीची पत्नी तारा त्या काळातील विद्वान स्त्री म्हणून ओळखली जात होती. रामायण काळात स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार असल्यामुळे सिया अभ्यास, अध्यापन, तत्वज्ञान सांगत असत.

2. महाभारत

याच काळातील द्रौपदीचा पाच जणांशी विवाह, सीतेचे हरण, महाभारतातील अंबिका, अंबालिका व सुभद्रा यांचा राक्षस विवाह या उल्लेखावरून स्त्रियांचा दर्जा खालावल्याची माहिती मिळते. या काळातील वरिष्ठ वर्गातील स्त्रियांना शिक्षण मिळत होते. पांडव वनवासात असताना द्रौपदी त्यांना नितीविषयक उपदेश करीत असे म्हणून तिला पंडीता म्हटलेले आहे.

या काळातील शिवा नांवाच्या एक संन्यासिनीचा उल्लेख मिळतो. तिने सर्व वेदांचा अभ्यास पूर्ण केलेला होता. सुलभा नावाची स्त्री जनकाशी मोक्षासंबंधी चर्चा करीत होती. काही स्त्रीया गृहस्थाश्रमात राहून उच्च दर्जाची अध्यात्मविद्या प्राप्त करत असत.

अरुंधती ही वशिष्ठ मुनींची पत्नी शिक्षका असून ज्ञानदानाचे ती कार्य करत असे. महाभारत काळात स्त्रीयांना ध्यान व चिंतन करण्यासाठी वानप्रस्थानात जाण्याची परवागनी मिळत असे. या काळातील खीया सर्वच विषयात तज्ञ असलेल्या दिसून येतात. धतराष्ट्राची पत्नी गांधारी ही एक विद्वान, हुशार, धार्मिक कार्यात तज्ञ असणारी स्त्री होती. ती आपल्या मुलांच्या बरोबर राजघराण्याच्याबद्दल चर्चा करीत असे. कती. द्रौपदी सारख्या प्रतिभावंत स्त्रीया त्या काळात होत्या.

महाभारतातील स्त्रियांना वेगवेगळ्या कलेचे ज्ञान असल्याचे दिसून येते. गायन, नृत्य, वाद्य, संगीतामध्ये त्या प्रविण असत. राजा विराटची मुलगी उत्तरा व तिच्या मैत्रिनींनी वेगवेगळी कला आत्मसात केली होती. राजा ययातीची मुलगी माधवी संगीतात प्रविण होती. सुलभा सारख्या हुशार स्त्रीने गुरुगृही राहून शिक्षण घेतले होते.

शिक्षणामुळे महाभारतातील स्त्रीयांचे समाज जीवन उच्च प्रतीचे असल्याचे दिसून येते.

**समारोप** :

थोडक्यात वेदकाळ व उपनिषदकाळ स्त्रियांसाठी चांगला होता. याकाळातील त्यांचा दर्जा त्यांना पुन्हा केव्हाही प्राप्त झाला नाही. स्मृतिकाळ पुरुषांचे वर्चस्व प्रस्थापीत होणारा व स्त्रियांचा दर्जा खालावणारा होता. गुप्तकाळानंतर स्त्रियांचा दर्जा एकदम घसरला. पुराणकाळात त्यांच्यावर अनेक बंधने आली. बालविवाह, केशवपन, सतीप्रथा, विधवापुनर्विवाहाचा अधिकार नाकारणे, शिक्षणाचा अधिकार नाकारणे इत्यादीमुळे स्त्री म्हणजे उपभोगाचे व प्रजाउत्पादनाचे साधन बनली.

समाजातील स्त्रीचे स्थान हे प्रामुख्याने संस्कृतीचा दर्जा व समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन यावर अवलंबून असतो. स्त्रीला पुरुषांची अर्धांगिनी बनविले, तसेच कौटुंबिक, सामाजिक, राजकिय व सांस्कृतिक क्षेत्रातील हक्कापासून वंचित केले, स्त्रिच्या स्वातंत्र्यावर बंधने लादण्यात आली असली तरी कन्या, पत्नी, माता म्हणून खीला अत्यंत आदराचे व मानाचे स्थान होते. वेदकाळात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षणाचा अधिकार होता. वैदिक काळीन समाज प्राधान्याने प्रगतशील होता. वेद, पुराणे, रामायण, महाभारत यासारख्या ग्रंथावरून वैदीक काळातील स्त्रीची सामाजिक व शैक्षणिक स्थितीची माहिती मिळते.

**संदर्भ** :-

1. प्राचीन भारत का इतिहास तथा संस्कृती, श्रीवास्तव के. सी., इलाहाबाद (1991)
2. प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, गायधनी र. ना. व राहूरकर ब. ग. कॉन्टनेंटल प्रकाशन, पुणे (1955)
3. प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, जोशी पी. जी., विद्या प्रकाशन नागपूर, (2003)
4. भारतीय इतिहासातील स्त्रीया, पाटील पद्मजा, जाधव शोधना, फडके प्रकाशन, (2007)
5. भारतीय शिक्षण प्रणालीचा विकास एम.डी. पवार, फडके प्रकाशन (2008)
6. भारतीय शिक्षणाचा इतिहास, शेटकर-मृण्मयी प्रकाशन (2008)
7. भारताचा इतिहास, प्राचीन व मध्ययुगीन, कोलारकर श. गो.